शनिवार दि.१२ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ३९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
दैनिक लोकनेता बीड
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# सयाजी शिंदेंचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश:विधान सभा निवडणुकीत स्टार प्रचारकाची जबाबदारी

## धोरणे आवडल्याने राष्ट्रवादीत आलो-अभिनेते सयाजी शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

अभिनेते सयाजी शिंदे यांनी शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मुंबईत आयोजित एका पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्ष प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ व सुनील तटकरे यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. येत्या विधानसभा निवडणुकीत ते पक्षाचे स्टार प्रचारक असतील असे अजित पवार यांनी यावेळी सांगितले. तर पक्षाची धोरणे आवडल्यानेच राष्ट्रवादीत येण्याचा निर्णय घेतला असे सयाजी शिंदे यावेळी म्हणाले.

सयाजी शिंदेंच्या पक्ष प्रवेशाच्या वेळी अजित पवार म्हणाले की, मी जास्त चित्रपट पाहत नाही. सजाजीरावांचे



काही चित्रपट मी बघितलेत. महाराष्ट्रातल्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही क्षेत्रात नाव कमावले तर त्याचा मला आनंद होतो. अनेक सामाजिक उपक्रमांचे नेतृत्व त्यांनी केले आहे. सयाजीरावांना झाडांची अतिशय आवड आहे. आपले डोंगर बोडखे होत चालले आहेत. तिथे सह्याद्री देवराईच्या माध्यमातून वृक्षारोपणाचे काम ते करतात. राज्यातील सिद्धिविनायक किंवा शिर्डी सारख्या मंदिरांत जर रोपटे हे प्रसाद म्हणून दिले तर लोक त्याला जिवापाड जपतील अशी सूचना त्यांनी केली. सयाजी शिंदे यांना विधानसभेत पक्षाच्या स्टार प्रचारकाची जबाबदारी देणार. पक्षात त्यांचा योग्य तो सन्मान केला जाईल. विजयादशमीच्या पूर्वसंध्येला त्यांचा प्रवेश होत आहे. ही एक चांगली गोष्ट आहे. आपण सर्व एकत्र येऊन एक नवा अध्याय लिहित आहोत. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची राष्ट्रवादीची भूमिका आहे. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांची आपली विचारधारा आहे. तीच पुढे नेण्याची आपली भूमिका आहे. सयाजी शिंदे यांचे मी पक्षात स्वागत करतो. नजिकच्या काळात असेच मान्यवर आपल्याला राष्ट्रवादीत येताना दिसतील.सयाजी शिंदे यावेळी म्हणाले की, मी राजकारणात येईन असं कधी वाटलंच नव्हतं. मात्र बऱ्याच गोष्टी करताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी मंत्रालयात दादांशी भेट व्हायची. त्यातून दादांच्या धडाडीने निर्णय घेण्याच्या स्वभावाचा अनुभव आला. अलिकडच्या आठ दिवसांत ठरलं की राजकारणात का यायचं नाही. कारण बाहेर राहून बोलण्याऐवजी सिस्टिममध्ये जाऊनच प्रश्न सोडवले पाहिजे असा निर्णय घेतला. पक्षाची धोरणे व निर्णय आवडले, म्हणून राष्ट्रवादीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

# मा.बालाजी पाटील खतगावकर यांच्या उपस्थितीत नाभिक समाजाचा महापरिवर्तन मेळावा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड येथे शिवरत्न जिवाजी महाले यांच्या जयंतीदिनानिमित्त मुखेड शहर व ग्रामीण भागातील नाभिक बांधवांच्या वतीने नाभिक समाजाचा महापरिवर्तन मेळावा आयोजित करण्यात आला होता. दिनांक ११ ऑक्टोबर रोजी मातोश्री मंगल कार्यालय, नरसी रोड, मुखेड येथे शिवरत्न जिवाजी महाले यांच्या जयंतीदिनानिमित्त मुखेड शहर व ग्रामीण भागातील नाभिक बांधवांच्या वतीने नाभिक समाजाचा महापरिवर्तन मेळावा आयोजित करण्यात आला होता. महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन केले आणि



दीपप्रज्वलन केले. नाभिक समाजाच्या वतीने शिवरत्न जिवाजी महाले यांचे स्मारक उभारण्याची मागणी श्री. सुरेश कोतवाले यांनी केली. जे मागे आहे त्यांना पुढे आणण्याचे काम आम्ही करत आहोत. वडिलोपार्जित कामाला गिफ्ट मानलं पाहिजे, कोणतच काम कमी नाही. आपल्या सर्वांचे व्यक्तिमत्व उभारण्याचं काम नाभिक समाज करत आहे. कामाला देव मानून आधुनिक पद्धतीने काम केले तर तुम्ही करोडपती होऊ शकता. त्यामुळे गाफील राहू नका. कोण काहीही करू शकतो, ही लोकशाहीची गरिमा आहे. ५ जानेवारी २०२४ ला राज्य सरकारने श्री. संत सेनाजी महाराज केसशिंपी महामंडळ स्थापन केले. यातून नाभिक समाजासाठी योजना आणली. या योजनेतून एक लाख रुपये कर्जाच्या स्वरूपात मिळतात. अडीअडचणी, दुःखात एकमेकांना मदत करावी. आपल्या पायावर उभे राहिले पाहिजे.यावेळी महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांचे खाजगी सचिव मुखेड कंधार विधानसभेचे फिक्स आमदार बालाजी पाटील खतगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# वडगाव रासाईच्या विद्यालयात नवरात्रोत्सवा निम्मित पारंपरिक भोंडला,गरबा कार्यक्रमाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडगाव रासाई येथील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिचे जतन करत नवरात्र उत्सवानिमित्त, शुक्रवार दिनांक ११/१०/२०२४भोंडल्याचा कार्यक्रम संपन्न झाला. सदरील कार्यक्रमात इयत्ता ५वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थिनींनी सहभाग घेत पारंपरिक गीत, गायना सोबतच ,पारंपरिक नृत्य, सादरीकरण करताना, टिपरे दांडिया, तसेच गरब्याचा आनंद लुटला. या कार्यक्रमात माता भगिनी पालकांनी मोठ्या हिरीरीने सहभाग नोंदवत कार्यक्रमची रंगत वाढवली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी,सौ खोपडे मॅडम,सौ



पोरे मॅडम, यांनी विशेष प्रयत्न केले.सांस्कृतिक विभाग, श्री मगर सर, श्री काकडे सर, मेंडके सर, झिंगाडे सर, तांबोळी सर, वळवी सर यांनी मा मुख्याध्यापक श्री दिवे सर यांच्या मार्गदर्शनात सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमास श्री सचिन परभाणे यांची उपस्थिती लाभली.



नागपूर : आज दि. ११-१०-२०२४ रोजी केंद्रीय मंत्री आयुष्मान रामदास आठवले यांची रवी भवन नागपूर येथे केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली चे राष्ट्रीय पदाधिकारी डॉ. बबनराव महामुने, बुलढाणा जिल्हा अध्यक्ष डॉ. डी. व्ही. खरात, जिल्हा संपर्क प्रमुख आयुष्मान अंकुश पडघान व राष्ट्रीय कार्यकारी उपाध्यक्ष डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली यांनी भेट घेतली. त्यावेळी जिल्ह्यातील जनतेची व सर्व कार्यकर्त्यांची आस्थेने चौकशी करून कुठलीही सामाजिक समस्या, अन्याय, अत्याचार संदर्भात न्यायासाठी त्यांच्याशी संपर्क साधल्यास निवारण करण्याचे आश्वासन त्यांनी सर्व उपस्थितांना दिले.( छाया:- लोकनेता न्युज नेटवर्क नागपूर)

## मुंडे बंधू भगिनींच्या उपस्थितीत पहिल्यांदाच दसरा मेळावा

# आज भगवान भक्ती गडावरील अभूतपूर्व दसरा मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-मा.सरपंच विठ्ठल राख

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

सिमोल्लंघनाचा उत्सव आपल्याला उर्जा आणि प्रेरणा दिल्याशिवाय राहत नाही. मा.मंत्री पंकजाताई मुंडे , कृषीमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे दोन्ही मुंडे बंधू भगिनी पहिल्यांदाच एकत्र दसरा मेळाव्यासाठी येत आहेत.तुमच्यासाठी...आपल्यासाठी तुम्ही पण या संत भगवानबाबांची जन्मभुमी असलेल्या सावरगावघाट येथे मा.ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भक्ती-शक्तीचे सिमोल्लंघन होणार या ऐतिहासिक दसरा मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मा.सरपंच विठ्ठल राख यांनी केले आहे.

सावरगांव घाट येथील राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जन्मगांवी होणाऱ्या दसरा मेळाव्याला मा.मंत्री पंकजाताई मुंडे, कृषीमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे,प्रितमताई मुंडे संबोधित करणार आहेत.या मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात येत आहे.संत भगवानबाबांची जन्मभुमी असलेल्या पाटोदा तालुक्यातील सावरगावघाट येथे राज्याच्या माजी ग्रामविकामंत्री मा.ना.पंकजाताई मुंडे,कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भक्तीचे सिमोल्लंघन होणार



आहे.काही वर्षापासून हा दसरा मेळावा भगवान बाबांची जन्मभुमी सावरगाव घाट येथे होत असून दसरा मेळावा रेकॉर्डब्रेक होत आहे.पंकजाताई मुंडेनी यांनी सांगितल्यानुसार संत भगवानबाबांचे भव्य स्मारक उभे राहीले आहे.सावरगांव येथील या ऐतिहासिक दसरा मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी राज्यातील अनेक साधुसंत, मंत्री,खासदार,आमदार यांच्यासह विविध विभागाचे,अधिकारी आणि पदाधिकारी तसेच भगवानबाबांचे भक्त आणि स्व.गोपीनाथजी मुंडेसाहेब यांचे चाहते लाखोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.त्यामुळे या दसरा मेळाव्यासाठी जास्तीत जास्त मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मा.सरपंच विठ्ठल राख यांनी केले आहे.

## सुट्टीची सूचना

आज दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ शनिवार रोजी विजयादशमी दसरा सणानिमित्त दैनिक लोकनेता कार्यालयास सुट्टी असल्याने उद्याचा अंक प्रकाशित होणार नाही याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी

## चारोळी

आला आला दसरा
भेदभाव विसरा
सोनं लुटून सौख्याचे
मोद चोहीकडे पसरा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# सोने व्यापाऱ्याला भरदिवसा बंदूकीचा धाक दाखऊन लुटले


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

तालुक्यातील शारा गावाजवळील वळण रस्त्यावर सोने व्यापारी आदित्य अजितकुमार संचेती वय ३५ यांना बंदूकीचा धाक दाखऊन व मारहाण करून लूटल्याची दि. ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडे पाच वाजे दरम्यान शारा शिवारात घडल्याने एकच खळबळ उडाली.लोणार येथील व्यापारी आदित्य संचेती यांचे सुलतानपूर येथे दर्शन ज्वेलर्स नावाचे सोन्या चांदीचे दुकान आहे. पोलीस तपास सुरु आहे.



नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोककल्याणकारी शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांचे चिरंजीव संदीप पाटील कवळे यांनी विविध ठिकाणच्या दुर्गा मंडळाना भेटी दिल्या नंतर त्यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आला यावेळी असंख्य भावीक भक्त उपस्थित होते




दसरा सणानिमित्त पत्रकार बाजीराव पाटील गायकवाड दैनिक लोकनेता नांदेड जिल्हा प्रतिनिधी तथा लोकशाही पत्रकार संघ मराठवाडा उपाध्यक्ष यांच्या नवीन नांदेड हडको येथील निवासस्थानी श्री महालक्ष्मी पूजन करण्यात आले.

# श्री भगवान विष्णू यांचे अंश अवतार म्हणून नाम करण व श्री क्षेत्र भगवानगडाचा वर्धापन दिन दसरा

राष्ट्र संत भगवानबाबा हे श्री भगवान विष्णू यांचे अंश अवतार म्हणून सृष्टीला परिचय झाला तो शुभ दसरा आणि बहुजन समाजाला दिशा देण्यासाठी भागवत धर्माचं पहिलं ज्ञान पीठ दसरयाच्या शुभ मुहूर्तावर भगवानबाबा यांनी निर्माण करत देशाला दसरा मेळाव्याची परंपरा प्रदान केली.भागवत धर्माचे प्रचारक प्रसारक जगाला मानवतेची शिकवण देणारे सद्गुरू सामाजिक समतेचे जनक जगद्विख्यात तत्वज्ञानी थोर प्रबोधनकार योग विद्या वेद शास्त्र पारागंत नवं निधी अष्ट सिद्धी प्राप्त ब्रह्मचारी समाजसुधारक गोहत्याबंदी चे जनक राष्ट्र संत भगवान बाबा बाल्य आधुनिक भारताचे जनक असून सुसंकृत महाराष्ट्राचे निर्माते आहेत बाबा बाल्य अवस्थेत असताना दसरयाच्या शुभ दिनी श्री क्षेत्र नारायणगडावर असताना गुरू मंत्र मिळवायचा म्हणून गुरू कडे हट्ट केला पण वय लहान असल्यामुळे गुरूंना प्रथम नकार दिला पण आबाजी मात्र महाबली हनमुंत व नचिकेत यांच्या सारखे जिज्ञासू असल्याने हट्ट सोडायला तयार नव्हते शेवटी आबाजी गुरू मंत्राचा हट्ट सोडेल म्हणून गुरूं माणिक बाबा यांच्या वाणीतून प्रकट झालेले शब्द आणि गुरू मंत्रासाठी होकार ऐकून जी दिव्य परिक्षा दिली त्या परीक्षेत गुरूंना साक्षात्कार झाला साक्षात्कारीले गुरू नाम ठेवीले भगवान आणि श्री भगवान विष्णू यांचे अंश अवतार म्हणून भगवान असे अधिकृत नामकरण आजच्या दिवशी झाले.गुरू माणिक बाबांचा आदेश शिरसावंद्य मानून सतर फूट शिखरावरून पांडुरंग अष्टक म्हणून गुरू मंत्र मिळवण्यासाठी उडान घेतलं आणि थेट गुरू माणिक बाबा यांच्या समक्ष भगवान विष्णू रूपाने गरूडावर विराजमान होऊन आबाजी प्रकट झाले म्हणून माणिक बाबा यांनी आबाजीचे भगवान असे नामकरण दसरयाच्या शुभ मुहूर्तावर केले.श्री भगवान विष्णू यांचे अंश अवतार राष्ट्र संत भगवान बाबा यांनी भागवत धर्माला आलेली ग्लानी संपुष्टात आणत भागवत धर्माचे रक्षण केले.समाजिक पातळीवर अज्ञान अंधश्रद्धा संपुष्टात आणली बाबांच्या आव्हानाल प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि राज्यात लाखो तुळशी माळा परिधान करत सद मार्गावर आले. लाखोंच्या संख्येने लोक व्यसन मुक्त झाले धर्म कार्याला लागले लाखो लोकांच्या मनात बाबांनी ज्ञान भक्तिची गोडी पेरली परिणाम लोकांना धर्म समजला बाबांनी वेद शास्त्र आणि ज्ञानेश्वरी सोपी करून सांगितले लोक कल्याणासाठी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्ठा करत निजामशाही व इंग्रज यांना न जुमानता लोक कल्याणकारी कार्य करत भागवत धर्माला बळकटी दिली.देशाच्या कानाकोपऱ्यात भगवत धर्म पोहचवला निजामशाही राजवटीत हैद्राबाद पर्यंत जाऊन लोकांच्या मनात भक्तिची शक्ति आणि आत्मविश्वास निर्माण केला.भागवत धर्म प्रचार आणि प्रसार करत असताना शिक्षणाचं महत्त्व लोकांच्या मनात रूजवले लोक शिकले लोकांना शिक्षणाचं महत्त्व समजलं गोरं गरीब वंचितांच्या शिक्षणासाठी शिक्षणाची दालन निर्माण केली म्हणून राष्ट्र संत भगवान बाबा हे शिक्षणाची ज्ञानगंगा बहूजन समाजाच्या घरोघरी पोहचवणारे



आधुनिक भगिरथ आहेत.संत परंपरेत ज्ञान आणि लक्ष्मीच वैभव एकत्र दिसत नाही पण श्री संत एकनाथ महाराज यांच्या नंतर श्री संत भगवान बाबा यांच्या कडे ते वैभव होत म्हणून भगवान बाबा हे राजयोगी संत होते. १९५१ मध्ये राजयोगी भगवान बाबा पाथर्डी तालुक्यातील खरंवडीच्या ओसाड डोंगरावर जाऊन बसले आणि दसरयाच्या दिवशी भगवी पताका वैश्विक पातळीवर पोहचविण्यासाठी धैम्य गडाचा पाया आरंभ केला आणि देशाला पहिला दसरा मेळावा दिला. हाच धौम्य गड पुढे राज्याचे पाहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण साहेब यांनी धौम्य गडावर येऊन धौम्य गडाच नामकरण भगवान गड केलं आणि त्याच धौम्य गडाचा भगवान गडाचा वर्धापन दिन दसरा मेळावा असून हि परंपरा आज राज्याच्या देशाच्या कानाकोपऱ्यात चर्चेत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अध्यत्मिक ज्ञाना मार्गाने राष्ट्र संत भगवान बाबांच ऐतिहासिक योगदान आहे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे जनक सुसंकृत महाराष्ट्राचे निर्माते म्हणून देखील भगवान बाबांच नाव अग्रक्रमाने घेतलं जातं.रावण अनितिचा पक्षधर आहे तरी देखील शक्ती रावणाच्या बाजूने लढते आहे हे निदर्शनास आल्यावर सृष्टीचे दैवत श्री प्रभु श्रीराम यांनी शक्ति आराधना आरंभ केली.आणि यशस्वी पणे आराधना करत अद्भुत अशा परिक्षे अंती भगवान विष्णू यांचे अंश अवतार प्रभु श्रीराम यांना त्रेता युगात शक्ति प्रसन्न झाली व विजयी भव आशिर्वाद दिला आणि रावणावर प्रभु श्रीराम यांनी विजय प्राप्त केला.शक्तिची साधना आरंभ ते शुभं आशिर्वाद दिन म्हणजे नवरात्रोत्सव आणि शुभ आशिर्वाद दिला दिन विजया दक्षमी आणि याच विजया दक्षमी ला पुढे कलयुगात श्री भगवान विष्णू यांचे अंश अवतार म्हणून राष्ट्र संत भगवान बाबा यांचा परिचय गुरू माणिक बाबा यांनी नारायण गडावरून जगाला करून दिला त्या नामकरण दिनाचा वर्धापन दिन आणि भगवत धर्माच ज्ञान पीठ आरंभ करत ऐतिहासिक दसरा मेळावा देशाच्या गौरवशाली इतिहासात निर्माण करत खरंवडीच्या डोंगरावर भगवी पताका फडकत दसरा मेळावा साजरा केला आणि आज तो वैश्विक पातळीवर पोहोचला त्याच ऐतिहासिक क्षणांचा वर्धापन दिन म्हणजे दुग्ध शर्करा योग आहे.श्री भगवान विष्णू यांचे अंश अवतार म्हणून नामकरण आणि धौम्य गड निर्मिती असा दुहेरी वर्धापन दिन म्हणजे ऐतिहासिक दसरा मेळाव्याच महत्व आणि व्याप्ती आहे.



**गणेश खाडे**
विचारवंत साहित्यिक लेखक
आध्यत्मिक मार्गदर्शक तथा
संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ

# नायगाव विधानसभा मतदार संघ हा सिंचना पासून दुर सर्वसामान्य जनतेचे हित कोसोदुर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । प्रतिनिधी**

नायगाव विधानसभा मतदार संघ हा उमरी, धर्माबाद नायगाव हे तिन तालुके मिळून मतदारसंघ २००९ ला अस्तित्वात आला. तेव्हा नायगावचे आमदार म्हणून दिवंगत वसंत चव्हाण हे बारा हजार मताधिक्याने अपक्ष निवडुन आले. त्या नंतर सन २०१४ निवडणुकीत दिवंगत वसंत चव्हाण परत निवडुण येऊन दहा वर्ष आमदार राहिले. २०१९ च्या विधानसभा मतदार संघाची निवडणूक लागली तेव्हा दिवंगत माजी आमदार वसंत चव्हाण हे कॉंग्रेस पक्षाकडून रणांगणात उतरले होते तर रिपाई गटाकडून राजेश पवार तर उद्योजक मारोतराव कवळे गुरूजी यांनी वंचित बहुजन आघाडीतुन उतरले होते. परंतु आ. राजेश पवार हे निवडुण येऊन आमदार होण्या मागचे कारण असे की माजी आमदार बापुसाहेब देशमुख गोरठेकर व गंगाधरराव कुंटूरकर, शिवराज पाटील होटाळकर अन्य जनाची साथ मिळाल्याने निवडुण आले. यात परत मारोतराव कवळे गुरूजी यांनी खा.अशोक चव्हाण यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून भाजप पक्षात प्रवेश केले. यात कवळे गुरूजी यांनी या पाच वर्षाच्या काळात जोमाने कामाला लागत व्हीपीके उद्योग समुहाच्या माध्यमातून दोन गुळपावडर कारखाने व एक साखर कारखाना, दुग्धव्यवसाय, कै. व्यंकटराव पाटील कवळे पतसंस्थेच्या विस शाखेचा जिल्हयात विस्तार वाढुन दांडगा जनसंपर्क तयार केले. तिन कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या ऊसाला जिल्हातील इतर कारखान्या पेक्षा जास्त भाव देऊन शेतक-यांची आर्थिक बाजू बळकट केले. साडेचार हजार तरुण बेरोजगार युवकास हाताला काम दिले आणी जिल्हातील व्यापारपेठ वाढवल्याने भाजप पक्षाकडुन नांदेड लोकसभेची किंवा नायगाव विधानसभेची उमेदवारी द्या असे पक्षाकडे रितसर उमेदवारीसाठी मागणी केली. आ.राजेश पवार यांनी मात्र आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात पाच वर्षांत मतदार संघात एकला चलो रे घेत ना कवळे गुरूजी, ना. होटाळकर, ना. बच्चेवार, ना. भिलवंडे, ना कुंटूरकर, ना गोरठेकर अशी भुमिकेत नायगाव मतदार संघातील भाजप पक्षातील नेते व कार्यक्रत्यांना दुर केले. त्यात परवा धर्माबात तालुक्यात आ. राजेश पवार यांनी लिंगायत समाजाच्या मुलावर गुन्हे दाखल केल्याने हा समाज आ. पवारांच्या विरोधात दुरावला गेला. तर उमरीत मराठा आरक्षण बाबतीत मराठा मुलावर गुन्हे दाखल केल्याने मराठा समाज हा दुरावला गेला त्यात परवा मोढ्यात श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या पदअस्थापनेच्या आयोजित कार्यक्रमातून आ. राजेश पवारांनी स्वर्गीय माजी आमदार बापुसाहेब देशमुख गोरठेकर यांची ४० वर्षाची हुकूमशाही मोडीत काढली व उमरी तालुका हा कुपोषित होता त्याला सुद्रड करण्याचे काम मी केले अशी जहरी टीका पवारांनी केल्याने गोरठेकरांच्या च्याहत्ते वर्गात नाराजी पसरले. तर आमदाराच्या सुविद्य पत्नी यांनी पक्षातीलच असलेले नेते तथा उद्योजक कवळे गुरूजी बद्दल बिनबुडाचे आरोप करून टिका केली त्यामुळे धर्माबाद सारखे उमरीत व नायगाव तालुक्यातील उद्योजक मारोतराव कवळे गुरूजी सर्मथकात नाराजीचा सूर या पवार दांपत्या विरूध विरोधात सुर असल्याने पवारांना विधानसभेची असो कि लोकसभेची निवडणूक जड जाईल असे चित्र मतदार संघातुन पुढे येत आहे. त्यात आ. राजेश पवार यांनी उमरी-धर्माबाद नायगाव तालुक्यात विकास कामे केले असले तरी ती कामे निकृष्ट दर्जाचे केल्याने त्यां कामाचा फायदा स्वतःचा आमदार व, गुतेदार, आधिकारी वर्गाचा आहे असे जनतेतून सूर उमटत असल्याने या भिती पोटी आ. पवार यांनी जनतेत आपले भिंग उघडे पडेल या भावनेतून मतदार संघात पुन्हा विद्यमान आमदारांची नाराजगी दिसत असल्याने निवडणुकांच्या तोंडावर जेष्ठ नागरिकांसाठी देवदर्शनासाठी आलेल्या निधी चा वापर करत मतदारांना काशी यात्रा देवदर्शन, छेच्या वाटप, व भंडारे करणे असा प्रयोग केविल वाणा प्रकार मतदार संघात सूरू केले. मागील परवा लोकसभेचे निवडणूकीत भाजप पक्षाचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा म्हणावे तेवढे प्रचार आ. राजेश पवार यांनी न केल्याने नायगाव विधानसभेच्या मतदार संघातुन पाच हजाराच्या वर लिड कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार स्वर्गीय वसंतराव चव्हाण यांना मिळाले होते. यात मात्र भाजपाचे प्रतिस्पर्धी कवळे गुरूजी यांनी मात्र अशोक चव्हाण यांचे विश्वासू सर्मथक असल्याने माजी खा. चिखलीकर यांचा प्रचार जिल्हाभर पिंजुन काढले हे यात भाजप पक्षाकडुन जिल्हय़ाच्या राजकारणात कवळे गुरूजीची जमेची बाजु ठरली हे विशेष. यात माजी आमदार वसंत चव्हाण खासदार म्हणून निवडून आले असले तरी आचानक लोकसभेचे खासदार वसंतराव चव्हाण हे आजारी पडुन अचानक त्यांचे दुखत निधन झाले. यातच २०२४ च्या विधानसभा कार्यकाळ तोंडावर निवडणुका जवळ येऊन ठेपल्याने विद्यमान आमदार राजेश पवार यांच्या विरोधात अनेक भाजप पक्षातील नेते मंडळी विधानसभेचे उमेदवारी द्या असे उतरले. तर माजी खा. भास्करराव खतगांवकर यांनी भाजप पक्षाला सोडचिठ्ठी देत मुंबई येथील कॉंग्रेस पक्ष कार्यालयात पक्ष प्रवेश करून आपल्या सुनबाई डॉ. मिनल खतगावकर यांना ही नायगाव विधानसभेची उमेदवारी द्या अशी मागणी केली. त गोरठेकराची तिसरी पिढी ऐन निवडणुकीच्या तोंडावर शरद पवार गटात पक्ष प्रवेश करुन आम्हाला विधानसभेची उमेदवारी द्यावी अशी मागणी केली. यातच विधानसभा सोबत नांदेड लोकसभा पोटनिवडणुक निवडणूक आयोगाने घेतली तर कॉंग्रेस पक्षाकडून स्वर्गीय खा. वसंतराव चव्हाण यांचे सुपूत्र प्रा. रविंद्र चव्हाण हे एकमेव उमेदवारी राहिली तर यांच्या प्रतिस्पर्धी भाजप पक्षाकडुन उद्योजक मारोतराव कवळे गुरूजी यांनी हि लोकसभेची किंवा विधानसभेची यापैकी कोणतीही उमेदवारी द्या अशी मागणी भाजप पक्षाकडे केली. जर भाजपकडून कवळे गुरूजीना लोकसभेची उमेदवारी मिळाली तर कॉंग्रेस पक्षाकडून प्रा. रविंद्र चव्हाण यांनी विधानसभेची उमेदवारी घेणार आणी डॉ मिनल खतगावकर यांना लोकसभेला जावे लागेल असे कॉंग्रेस गोटातुन चर्चा पुढे येते असून असे फेरबदल कॉंग्रेस पक्षाकडून होऊ शकते. नायगाव विधानसभेचे भाजप पक्षातील तिसरे उमेदवार शिवराज पाटील होटाळकर यांनी मागणी ही पक्षाकडे उमेदवारी मागणी केली. माजी वैद्यकीय आधिकारी डॉ माधव विभुते यांनी ही ओबीसी चेहरा ठरवत मला विधानसभेची उमेदवारी द्या असे भाजप पक्षाकडे मागणी केली, तसेच छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष माधव ताटे यांनी ही मला जरांगे पाटील यांच्या कडून उमेदवारी घेऊन मी निवडणुकी च्या रिंगणात उतरणार एल्गार केले. विद्यमान आमदार राजेश पवार बद्दल भाजप पक्षातील अनेकांनी बंड विरोधात असल्याने निवडून येणे अवघड दिसते. नांदेड लोकसभेला पोटनिवडणुक कॉंग्रेस पक्षाकडून उमेदवार ठरल्याने जिल्हयात भेटीगाठी भर दिसत आहे. तर भाजप पक्षाकडुन नांदेड लोकसभेचा उमेदवार व नायगाव विधानसभेचा उमेदवाराचा घोळ दिसत दिसते. १) मारोतराव कवळे गुरूजी, ३) रविंद्र चव्हाण, ३) विद्यमान आमदार राजेश पवार

# लोह्यातील व्यापारी माझ्या कुटुंबातील आहे येणाऱ्या काळात मोढ्यातील सर्वच विकास कामे होतील-माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा मोंढा येथील व्यापारी माझ्या कुटुंबातील आहेत येणाऱ्या काळात मोढ्यातील सर्वच विकास कामे होतील असे प्रतिपादन माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लोहा मोढा यार्डातील व्यापाऱ्यांच्या संवाद व हितगुज बैठकीत केले. दि. १० ऑक्टोबर रोजी लोहा मोढा यार्डातील व्यापाऱ्यांशी संवाद व हितगुज बैठकीचे आयोजन मोंढा येथील चिंतामणी गणपती मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी अनेक व्यापाऱ्यांशी संवाद साधुन त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांच्याशी हितगुज केले. यावेळी लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे व्यापारी मतदार संघांचे संचालक किरण सावकार वटमवार, संचालक केशवराव मुकादम, ग्रीन मर्चंट व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार, सचिन पाटील चिखलीकर,माजी उपनगराध्यक्ष दता भाऊ वाले, माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण, दिनेश सावकार तेललवार,नगरसेवक भास्करराव पाटील पवार,शिवसेनेचे लोहा -कंधार विधानसभा प्रमुख मिलिंद पाटील पवार, ॲड विलास चव्हाण,बाळू सावकार पालीमकर, विकास कोटगिरे, भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष अविनाश पाटील पवार दिपक पाटील कानवटे, सचिन मुकादम,, संदिप पाटील जाधव, बाळासाहेब कदम ,व्यंकट जंगले, हनुमंत कटकमवार, डोके, मोटरवार, शेख शादुला, यांच्या सहित मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, मी तुमच्यासोबत निवडणुकीपुरता नाही.चिखलीकर कुटुंबीयांच्या जडणघडणीत तुमचा मोठा वाटा आहे. मागच्या वेळेस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्यामुळे नांदेड लोकसभा निवडणूक लढविली. माझा पराभव झाला प्रत्येक बुथवर किमान सात -आठ मते वाढली असती तर विजय झाला असता. जे झाले ते माझ्या नशिबाने झाले माझा कुणावरही राग नाही. पक्षाने कालच्या बैठकीत दोन पर्याय ठेवले नांदेड लोकसभेची पोट निवडणूक लढवा किंवा लोहा -कंधार विधानसभा



छाया-विनोद महाबळे.

निवडणुक लढवा. नांदेड लोकसभेची जागा खा. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे खाली झाली आहे. सगळे म्हणत होते लोकसभा लढवा पण मी म्हणालो लोहा -कंधार विधानसभा लढविणार आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघात लोहा विधानसभा मतदारसंघ असता तर फार मोठा विजय झाला असता. काही वर्तमानपत्रांतून बातम्या आल्या की मी नांदेड दक्षिण विधानसभा लढविणार आहे. पण ते साफ चुकीचे आहे मी पुन्हा सांगतो की,मी लोहा -कंधार विधानसभा निवडणुकीच लढविणार आहे . मी मोंढ्यात जी विकास कामे केली आहेत ती तुम्ही सता दिली म्हणून केलीत काही उपकार केला नाही. मोढ्यातील सर्वच विकास कामे करुत मोढ्यातील व्यापारी हा माझ्या कुटुंबातील आहे. तुमचा संबध शेतकरी कष्टकरी यांच्याशी आहे. तुम्ही एका बसुन जे करू शकता ते कुणीही करु शकत नाही. तुम्ही स्वत: प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणून काम करा व आशीर्वाद द्या असे माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले. कार्यक्रमांचे प्रस्ताविक लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक किरण सावकार वटमवार यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन नगरसेवक भास्करराव पाटील पवार यांनी केले.

> **“यावेळी किरण सावकार वटमवार, नामदेव कटकमवार, यांच्यासहित अनेक व्यापाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले व माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांना खंबीरपणे आम्ही तुमच्या पाठीशी आहोत असे सांगितले.तसेच नामदेव कटकमवार यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शाल पुष्पहार घालून सत्कार केला.**

# पोल्ट्री व्यावसायिकांमध्ये व्यावसायिक साक्षरता असणे महत्त्वाचे-सचिन परभाणे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

पोल्ट्री व्यवसाय करत असताना केवळ साक्षर असून चालत नाही, तर... तो व्यवसायिक साक्षर होणं हे महत्त्वाचे आहे आणि यासाठी संपूर्ण महाराष्ट्रा मध्ये महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि या संस्थेच्या माध्यमातून सर्व पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री अनिल खामकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न सुरू आहेत.

व्यवसाय करीत असताना व्यावसायिक साक्षरता आपल्या बांधवांच्या मध्ये असायला हवी आणि यासाठी व्यवसायातील बारीक-सारीक गोष्टींकडे आपल्या बांधवांनी लक्ष दिले तर... अगदी आपल्या बांधवांचा, कोंबडी खत विक्री संदर्भात, औषधे खरेदी करणे, पोल्ट्रीची विविध इक्विपमेंट खरेदी करणे, पडदे असतील, जाळी असेल ,तुस खरेदी,खाद्याचा मोकळा बारदान असेल बारकाईने विचार शेतकऱ्यांनी एकमेकांशी संगनमताने करण्याची गरज आहे.विचारांची देवाणघेवाण केली तर... अत्यंत रास्त भावांमध्ये या सर्व गोष्टी शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे व्यावसायिक शेतकऱ्यांनी आपल्या व्यावसायिक बांधवांसोबत सदैव एकी ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. आणि यासाठी संघटित होणे, संघटनेसोबत होणे ही देखील अत्यावश्यक गोष्ट आहे असे मत सचिन परभाणे यांनी मांडले व्यवसाय करत असताना



अत्यंत हुशारीने आणि आणि लक्षपूर्वक केला तर कोणताही व्यवसाय कनिष्ठ नसतो त्यामुळे जर आपण या सर्व बारीक सारीक गोष्टींच्याकडे बारकाईने पाहिले तर आपल्याला मिळणाऱ्या नफ्यामध्ये अजून वाढ होण्यासाठी वाव असतो आपण संघटनेच्या माध्यमातून कंपन्या आपल्या वरती जो अन्याय करत आहेत ,आपली जी फसवणूक होत आहे त्यासाठी मोठा लढा देत आहोत, आजपर्यंत आपल्याला मिळणाऱ्या जीसी(ऋउ) स्ट्रक्चर मध्ये बदल करण्यामध्ये संघटनेचा मोठा वाटा आहे.

संघटनेच्या माध्यमातून बऱ्याच शेतकऱ्यांना पेमेंट मिळालेले आहे.याशिवाय शासन दरबारी देखील ग्रामपंचायत मालमत्ता करा संदर्भात, लाईट बिल संदर्भात, शेतकऱ्यांना सौर पॅनल उपलब्ध करण्यासंदर्भात पाठपुरावा संघटना करीत आहे महाराष्ट्र शासनाने, केंद्र सरकारच्या गाईड लाइन्स महाराष्ट्रामध्ये लागू करणे, खाद्य बॅग वरती कन्टेन्स टाकण्यासंदर्भात आदेश काढलेला आहे. या गोष्टी सातत्याने राज्यस्तरीय समन्वय समिती सदस्य, मांडीत आहे सर्वसामान्य शेतकऱ्याला चांगले दिवस यावेत. यासाठी संघटना रात्रंदिवस प्रयत्न करीत आहे अनेक शासन आदेश आजपर्यंत संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या फायद्याचे काढलेले आहेत मात्र त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी व्हावी. यासाठी सर्व शेतकऱ्यांची देखील साथ अत्यावश्यक आहे कारण कोणतीही गोष्ट शेतकऱ्याला सहजासहजी मिळत नाही त्यासाठी खूप मोठे आंदोलन , खूप मोठा लढा उभा करणे आणि या लढ्यामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी एकत्रित येणे ही काळाची गरज आहे असे मत श्री सचिन परभाणे यांनी मांडले.

# विष्णू भाऊ घुले यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**

केज पंचायत समिती सभापती तथा भाजपचे युवा नेते विष्णुभाऊ घुले यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विष्णू भाऊ घुले मित्रमंडळाच्या वतीने आज श्री स्वामी समर्थ वृद्धाश्रम येथे किराणा सामान वाटप, उपजिल्हा रुग्णालय केज येथे रुग्णांना फळ वाटप व मुकभदिर मतिमंद निवासी विद्यालय केज येथील मुलांना शालेय साहित्य वाटप करून फळ वाटप केले अशा विविध उपक्रमातून साजरा करण्यात आला .

केज येथील सामाजिक कार्यात सर्वात अग्रेसर असणारे नेते म्हणजे विष्णू भाऊ घुले अशी त्यांची ओळख आज या नेत्याचा वाढदिवस त्यांच्या या वाढदिवसाच्या निमित्ताणार केज शहरातील वृद्धाश्रम येथे किराणा सामान वाटप , उपजिल्हा रुग्णालय फळ वाटप , मूकबधिर शाळा येथे शालीय साहित्य वाटप करून आशा सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या नेत्याचा वाढदिवस साजरा करण्यात आला या वेळी



विष्णू भाऊ घुले मित्र मंडळाचे सचिन सिरसाट, चंदू मिसळ, भगत मुळे, नानाभाऊ भांगे, आणा वायबसे, बाबुराव घुले, मल्हारी बारगजे, धनराज लाटे, दत्ता घुले, विक्रम डोईफोडे, शिवराम घुले, सोनू सावंत, अविनाश गाताडे, दुर्गादास लांब, सुखदेव कापरे, सतीश घुले, शिवाजी घुले, संतोष घुले, धनराज घुले, दिगंबर घुले, अमोल शेप, केशव भांगे, ईश्वर बिक्कड, अभी घाटूळ , राजेभाऊ उगले, सुनील शिंदे, दिनुभाऊ घुले, हरिदास घुले, अशोक बारगजे, दिनकर बारगाजे, शिवराज घुले, जयशिग घुले, गोविंद घुले, संतोष क्षीरसागर, गणेश घुले, मिनीनाथ घुले, राम घुले, प्रकाश बारगाजे, राम घुले, अर्जुन बारगजे, भास्कर घुले, विष्णू घुले, राजेश तिडके, सुखदेव कापरे, बबलू बारगजे, दिगंबर मुंडे, अमोल सावंत, बालाजी मिसाळ, महिंद्रा आंधळे, दत्ता मिसाळ, कृष्णा आघाव, भाऊसाहेब आंधळे, दीपक आंधळे, बीबीशन आघाव, अमोल मिसाळ, अमोल मुळे, संतोष मिसाळ, दीपक मिसाळ यांच्यासह विष्णू घुले मित्रपरिवारातील सर्व कार्यकर्ते व परिसरातील प्रमुख सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संवेदनशीलता हा साहित्य लेखनासाठीचा अविभाज्य निकष-प्रा.मधुकर जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

अन्न, वस्त्र, निवारा हे जसे जगण्यासाठीचे मूलभूत घटक मानले जातात, त्याच प्रमाणे साहित्याला पूर्णत्व येण्यासाठी साहित्यिकाने संवेदनशील असणे गरजेचे आहे, एव्हाना साहित्य लेखनासाठी संवेदनशीलता हा अविभाज्य निकष मानला जावा, असे प्रतिपादन श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा येथील मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांनी केले. विदर्भ महाविद्यालय, बुलढाणा येथे मराठी तसेच इंग्रजी भाषा, इतिहास व ग्रंथालयशास्त्र अभ्यास मंडळाच्या उद्घाटन समारोह प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य एम. टी. जमइवार यांची उपस्थिती होती. अतिथी प्रा. रवींद्र सोनीने, इतिहास विभागप्रमुख डॉ. संगीता पवार, ग्रंथपाल प्रा. राऊत, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. वाघमारे हे देखील




उपस्थित होते.

इंग्रजी, मराठी, इतिहास या विषयांकडे फक्त परीक्षेच्या दृष्टीने पाहू नका त्यांच्या अभ्यासाने जीवनात कसा फायदा होईल आणि रोजगार कसा मिळेल याकडे लक्ष द्या, असे आवाहन प्रा. जाधव यांनी केले.

याप्रसंगी अतिथी प्रा. रवींद्र सोनोने यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.प्राचार्य एम.टी. जमईवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना घर माणसांनी भरलेले आहे पण आपसात मात्र काहीही संवाद होत नाही, ही खेदाची बाब आहे, असे मत व्यक्त केले तसेच आपण सर्वांनी माणुसकी जोपासून प्रसन्नतेचे वातावरण निर्माण केले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले. याप्रसंगी विविध अभ्यास मंडळाची कार्यकारिणी गठीत करण्यात आली.डॉ. संगीता पवार यांनी अभ्यासपूर्ण प्रास्ताविक केले. उपस्थितांचे आभार प्रा. राऊत यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांना साथ द्यावी-रोहन गलांडे पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**

केज तालुक्यातील व महाराष्ट्रातील मराठा बांधवांना त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार कुणबी १२ ऑक्टोंबर नारायण गड येथे संघर्ष योद्धा आदरणीय जरांगे दादा पाटील यांनी घोषित केलेला दसरा मेळावा त्या मेळाव्यासाठी मी एक सेवक म्हणून दसऱ्या मेळाव्याची ला १८ पकड जाती जमातीतील मित्र कंपनीने आणि मराठा बांधवांनी यावे, म्हणून कॉर्नर बैठका घेत असल्यामुळे ,पण त्याही बैठका भारतावर इंग्रजांचे राज्य असताना स्वातंत्र्य मिळवण्यासाठी स्वातंत्र्य सेनानी गोपनीय बैठका घेत होते ,आज च्या घडीला केज मतदार संघात, अघोषित हुकूमशाही चालू आहे ,त्यामुळे मीही गोपनीय बैठका घेतल्या आणि आता तर ओपन बैठका घेणार असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. समाजासाठी मेलो तरी चालेल याची परवा नाही, मराठा मरेगा पर डरेगा नहीं मेलो




तरी मराठा समाजासाठी मरेल व तरी येणाऱ्या १२ तारखेला दसरा मेळाव्या निमीत्त नारायण गडावर करोडोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी केले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व जागेंसह श्रीगोंदा विधानसभा मनसे पुर्ण ताकदीने लढविणार-शेळके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

चार तारखेला झालेल्या नाशिक येथील दौऱ्यानंतर राज ठाकरे साहेबांच्या आदेशानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वच जागा महाराष्ट्र नवनिर्माण सेना ताकदीनिशी लढवणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष श्री सचिन डफळ यांनी पत्ररकारपरिषदेत दिली. तालुकाध्यक्ष श्री अतुल कोठारे यांनी पत्रकारांशी बोलताना, श्रीगोंदा विधानसभेची जागा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा सचिव श्री संजय शेळके हे पूर्ण ताकतीनेशी लढवणार असल्याचे सांगितले. पक्ष स्थापनेपासून एकनिष्ठ असणारे शेळके हे मनसेच्या माध्यमातून काम करत असताना सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी वेळप्रसंगी आंदोलनाच्या माध्यमातून काम करत असताना सर्वसामान्य समाजाला न्याय देण्याचे काम त्यांनी केले आहे.

तालुक्यातील जनतेला आजपर्यंत प्रस्थापितांकडून दरवेळेस अनेक प्रकारचे प्रलोभने आश्वासने दिले जातात परंतु पुढच्या पाच वर्षाला त्याच मुद्द्यावर पुन्हा निवडणूक लढवण्यासाठी तेच प्रश्न त्याच समस्या तेच मुद्दे उपस्थित करून गेली ४० वर्षे तालुक्यातील जनतेची दिशाभूल करुन फार मोठी फसवणूक केली. श्रीगोंदा तील सर्वात मोठी समस्या म्हणजे बेरोजगारी तरुण शिकतायेत मोठे होत आहेत पण तालुक्यातील तरुणांसाठी तालुक्यात फक्त सुशिक्षित बेकारी चा कारखाना उभा राहिलेला दिसतो हाताला काम देणारा कारखाना आजपर्यंत आला नाही किंवा कुठला उद्योग धंदा उभा राहिला गेला नाही एम आय डी सी चे फक्त गाजर दाखविले. गावागावातील तरुण



राजकारणापुरते वापरायचे व नंतर सोडून द्यायचे त्यामुळे तरुण पिढी वाचवायची असेल तर जनतेने तालुक्यात बदल करणे खूप महत्त्वाचे आहे. तालुक्यातील वीज ,पाणी व रस्ते हा प्रश्न आजतागायत सुटला जात नाही याला जबाबदार कोण आहे ? जनतेला हे सर्वजण गृहीत धरतात ही लोकशाहीची निवडणूक आहे कोणत्याच घराणेशाहीची नाही आपण सुज्ञ नागरिक आहोत जनतेने ठरवलं तर लोकशाही वाचवायला आणि बदल घडायला वेळ लागत नाही मग समोर कोण किती पैसेवाला आहे हे महत्त्वाचे नसते खरंतर जनता बदल करायला तयार आहे परंतु जनतेपुढे असा पर्याय नसल्याकारणाने आज पर्यंत तेच तेच प्रतिनिधी निवडून जातात आणि विकासाला तिथेच मर्यादा येतात. त्यामुळे यावेळेस ही निवडणूक जनताच हातात घेईल श्रीगोंदा मतदार संघात एक नवा इतिहास घडेल. त्यामुळे मनसेच्या माध्यमातून सन्माननीय राज साहेबांच्या आदेशाने येणारी पाच वर्षे सदैव काम करण्यासाठी जनतेने संधी द्यावी मी जनतेची सेवा करण्यासाठी सेवक म्हणून मी कटिबद्ध राहील असे संजय शेळके यांनी सांगितले.

# खानवटे येथील गटर चारीमध्ये,चोर चोर मावसभाऊ दोघे मिळून वाटून खाऊ

## उप अभियंता आणि शाखा अभियंता यांनी केली कामाची पाहणी !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

खानवटे ता.दौंड येथील भूमिगत गट योजनेचे काम हे १५ वा वित्त आयोगाच्या निधीतून तिन ठिकाणी करण्यात आले आहे.हे काम अतिक्रमण मध्ये शासकीय गायरान गट नंबर २८८ मध्ये झालेले आहे.या कामाची कसलीही परवानगी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडून घेतलेली नसून सदरचे क्षेत्र हे जिल्हाधिकारी पुणे यांच्या मालकीचे असून विनापरवाना खोदाई करून गटर योजनेचे काम शासकीय जागेत करण्यात आले आहे.तसेच झालेले काम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे केले असून,शाखा अभियंता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती दौंड आणि उपअभियंता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती दौंड यांनी कामाची पाहणी न करता,काम इस्टिमेट नुसार न करता,गटरचारीचे खोदाईचे काम इस्टिमेट प्रमाणे न करता,चेंबरची संख्या कमी करून गटरचे पाईप फक्त दिड फुट गाढलेले आहेत. चेंबर लांब अंतरावर टाकलेले आहेत.त्यामुळे गटरपाईप लाईन ही जमिनीच्या वरच असून ती फुटण्याची दाट शक्यता आहे.तसेच चेंबर जास्त अंतरावर असल्याने गटचारी जाम (ब्लॉक) होऊन लिकेज होऊन दुर्गंधी पसरण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे या कामात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे.म्हणून संबंधित कामाविषयी माजी सरपंच बबनराव धायतोंडे यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती दौंड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे,जिल्हा अधिकारी पुणे यांच्याकडे लेखी तक्रार करून संबंधित दौंड पंचायत समिती चे पाणी पुरवठा विभागाचे शाखा अभियंता योगेश दिवेकर आणि उपाभियंता यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे.त्यामुळे गटविकास अधिकारी पंचायत समिती दौंड यांनी कार्यकारी अभियंता पा.पु.विभाग जि.प.पुणे यांना आपल्या



स्तरावरून चौकशी करण्यात यावी असे दि.०७/१०/२०२४ रोजी लेखी कळविले आहे. त्यामुळे आता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती येथील शाखा अभियंता योगेश दिवेकर व उपअभियंता ढाके आणि ठेकेदार हे चोर चोर मावसभाऊ आणि दोघे मिळून वाटून खाऊ, अशी चर्चा खानवटे गावात जोरात चालू आहे. यांच्यावरती काय कारवाई होणार याकडे सर्व खानवटे ग्रामस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.

> **“ योगेश दिवेकर ग्रामिण पा.पु.विभाग प.स.दौंड यांना संपर्क साधला असता ते म्हणाले आमच्या विभागाचे कर्मचारी शिंदे यांनी मला चुकीची माहिती दिली.त्यांना संबधित कामावर पाहणीसाठी पाठवले होते त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवल्यामुळे आम्ही अडचणीत आलो आहे.आणि कामात हयगय झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे.**

# आजी,माजी आमदारांनी शेतकरी,सर्वसामान्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले-माजी राज्यमंत्री सुरेश धस

## सुरेश धस हे विकासाभिमुख तडफदार नेतृत्व-चंदूलालजी साहू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | प्रतिनिधी**






सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये आपला अल्पशा मताने पराभव झाला त्यानंतर गेल्या दहा वर्षातील आष्टी विधानसभा मतदारसंघातील आजी आणि माजी आमदारांनी सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले नाही परंतु आपण या आमदारांची उणीव भासू दिली नाही सतत सर्वसामान्य जनतेच्या, शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करत असून दैनंदिन सुखदुःखात सहभागी होत असतो असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले. आष्टा (हरिनारायण) या जिल्हा परिषद गटातील भातोडी, आष्टा (हरिनारायण),आंधळेवादि आणि आष्टी मुर्शदपुर येथील रस्ते कामांच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे छत्तीसगड येथील माजी खासदार आणि ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष चंदुलालजी शाहू उपस्थित होते. ते पुढे म्हणाले, आष्टा (हरिनारायण) जिल्हा परिषद गटातील सर्व गावांमध्ये दर्जेदार रस्त्यांची कामे, पाणीपुरवठा योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत गावो गावी शेततळे, तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना देताना आपण कोणताही भेदभाव केला नाही आजी-माजी आमदारांनी आष्टा (हरिनारायण) परिसरातील गावातील शेतकऱ्यांना योग्य दाबाने आणि पुरेसा वीजपुरवठा करण्यासाठी काही उपाय योजने न केल्यामुळे सध्या या परिसरामध्ये शेतकऱ्यांना सिंचनासाठी अडचणी निर्माण होत आहेत अखेर आपण स्वतः वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून वीज पुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावला आहे. दैनंदिन प्रश्नांसाठी सर्वसामान्य लोकांसाठी आपले दार सतत खुले असल्यामुळे मी विधानसभा सदस्य नव्हतो तरीही परिसरातील जनतेला मी याची उणीव भासू दिली नाही आपले राजकीय विरोधक जनतेचे मनभेद भरून पोळी भाजण्याचा प्रयत्न करत आहेत केवळ निवडणुकीच्या काळामध्ये जनतेत मिसळण्याचे काम सुरू असून ठोस विकास कामांचे पुरावे ते देऊ शकत नाहीत त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूक आपल्या सर्वांच्या आशीर्वादावर लढवणार असून आष्टा हरिनारायण जिल्हा परिषद गटातील जनता हे माझे कुटुंब आहे. आज आष्टा (हरिनारायण) ते शिंदे वस्ती ३ कोटी ८३ लाख रुपये, भातोडी विविध विकासकामांचे भूमीपूजन ३ कोटी २९ लाख आंधळेवाडी रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन ४ कोटी ८ लाख,मुर्शदपूर खडकत रोड ते माऊली मंदिर रस्ता भूमीपूजन ५ कोटी रुपये पिंपरी रोड भूमीपूजन सिमेंट रस्ता ४ कोटी या विकास कामांचा शुभारंभ करण्यासाठी आलो आहे निवडणूक प्रचार काळात मते मागण्यासाठी आल्यानंतर आणखी सविस्तर भाष्य करणार आहोत असे सांगितले यावेळी भारतीय जनता पार्टी च्या वतीने आष्टी विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या मनातील कौल आजमावण्यासाठी निरीक्षक म्हणून आलेले छत्तीसगड येथील माजी खासदार आणि ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष चंदुलाल साहू आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, सुरेश धस हे सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाची जाणीव असलेले तडफदार नेतृत्व असून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सबका साथ सबका विश्वास सार्थ ठरवण्यासाठी महाराष्ट्रात देखील भारतीय जनता पार्टी मित्र पक्षांचे सरकार पुन्हा यावे आणि आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पार्टीचा आमदार व्हावा त्यासाठी प्रत्येक मतदार आणि प्रत्येक मत महत्त्वाचे असून या मताद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदींना विश्व नेतृत्व करण्याची संधी मिळाली असून हे नेतृत्व आणखी प्रबळ करण्याची आवश्यकता आहे महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, डॉ.आंबेडकर यांच्यासारख्या असामान्य व्यक्तिमत्त्वांची, ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज या संतांची आणि वीर सावरकर, चाफेकर बंधू या क्रांतिकारकांची आहे त्यामुळे महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीचे सरकार पुन्हा आणावे यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा आणि परिश्रम करण्याचे आवाहन त्यांनी शेवटी केले. यावेळी जि. प .सदस्य अमर निंबाळकर,सरपंच गणेश माळवे,नगराध्यक्ष जिया बेग,खंडू दादा जाधव, सरपंच अशोक मुळे,माजी सरपंच सचिन लोखंडे,माजी सरपंच अतुल कोठुळे,कपिल अग्रवाल,मनोज धनवडे,सतिष जंगले,बबलू भाई,जितेंद्र शिंदे,किशोर झरेकर,शहादेव नरवडे,अभियंता सौदागर,गणेश पोकळे,आशिष अग्रवाल,बंटी धोंडे,बाळासाहेब बोराडे,अविनाश गिरी यांच्यासह मान्यवर,पदाधिकारी, पत्रकार,आष्टा ह.ना.,आंधळेवाडी,भातोडी, मुर्शदपूर, शिंदेवाडी,कासारी आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कुणी पाणी देता का? पाणी चुंबळी ग्रामस्थांची आर्त हाक

# विविध योजनेचे पाणी नेमकं कोणाच्या घशात चौकशी करा-कॉ.महादेव नागरगोजे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा | प्रतिनिधी**



पाटोदा तालुक्यातील चुंबळी हे गाव आदर्श गाव म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. मात्र या गावात जलस्वराज्य योजना, स्वजलधारा योजना, वॉटर फिल्टर, आताची जल जीवन योजना राबविण्यात आली या मुळे गावात मोठमोठ्या टाक्या उभारण्यात आल्या असून सर्व गल्ली बोळातून पाईपलाईनचे जाळे निर्माण करण्यात आले. मात्र चुंबळी ग्रामस्थांना पिण्याचे पाणीच आले नसल्याने नेमकं योजनेचं पाणी कुणाच्या घशात जातंय व उभारण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्या हे शोभेसाठीच आहेत का ? यांची चौकशी करावी. या साठी आदर्श गाव चुंबळीचे रहिवासी कॉ.महादेव नागरगोजे यांनी मा.जिल्हाधिकारी बीड, मा.उपविभागीय अधिकारी, मा.तहसीलदार पाटोदा, गटविकास अधिकारी पाटोदा यांना निवेदन सादर करून मागील १५ वर्षांपासून चुंबळी गावाला पिण्याचे पाणी, सांडपाण्यापासून वंचित ठेवणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी. नसता १४ ऑक्टोबर पासून बेमुदत अमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे. दिलेल्या निवेदनात कॉ.महादेव नागरगोजे यांनी म्हटले आहे की चुंबळी गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी विविध योजना राबविण्यात आल्या आहेत तरी ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी रानोमाळ भटकंती करावी लागत असुन दुषित पाण्यामुळे ग्रामस्थांना विविध आजारांना सामोरे जावे लागत असुन ग्राम पंचायत मार्फत पिण्याच्या पाण्यासाठी विविध योजने अंतर्गत अधिकाऱ्यांच्या संगनमताने हयात नसलेल्या विहिरी नोंद करण्यात आली. तसेच सन २०१७-१८ चा १४ वा व १५ वा वित्त आयोगातील अपहार करणाऱ्या विरोधात चौकशी करून शासन निर्णया नुसार कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

### काँग्रेसचे गुपित उघड,त्यांची बत्ती गुल

# ते जातीजातीत विष पसरवत आहेत-पंतप्रधान मोदी

## हरियाणाने सांगितले-देशविरोधी राजकारण चालणार नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

मंगळवारी, हरियाणा आणि जम्मू-काश्मीर निवडणुकीच्या निकालानंतर, भाजपने दिल्लीतील पक्षाच्या मुख्यालयात कृतज्ञता सभा आयोजित केला होता.कार्यक्रमात पीएम मोदी म्हणाले- हरियाणाच्या लोकांनी चमत्कार केला आहे. काँग्रेसचे गुपित जनतेसमोर उलगडले आहे. त्यांची बत्ती गुल झाली आहे. सरकारमधून बाहेर पडल्यावर त्यांची अवस्था जलबिन मछलीसारखी झाली आहे, त्यामुळे ते समाजात जातीचे विष पसरवत आहेत. समाजातील विविध घटकांना भडकावण्याचे काम ते करत आहेत.हरियाणातील गीतेच्या भूमीवर सत्याचा विजय झाल्याचे पंतप्रधान म्हणाले. जम्मू-काश्मीरमध्ये अनेक दशकांच्या प्रतीक्षेनंतर पहिल्यांदाच शांततापूर्ण निवडणुका झाल्या. हा भारतीय संविधानाचा विजय आहे, भारताच्या लोकशाहीचा विजय आहे.पंतप्रधान म्हणाले की, आज नवरात्रीचा सहावा दिवस, कात्यायनी मातेच्या पूजेचा दिवस आहे. कात्यायनी माता सिंहावर बसून आणि हातात कमळ घेऊन आशीर्वाद देत आहे. अशा शुभदिनी हरियाणात तिसऱ्यांदा कमळ फुलले आहे.नड्डा म्हणाले - हरियाणाच्या विजयाचे श्रेय पंतप्रधान मोदींना जाते हरियाणा आणि जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजप मुख्यालयात आयोजित कृतज्ञता सभेत मोदींपूर्वी अध्यक्ष जेपी नड्डा यांनी विजयाचे श्रेय पंतप्रधान मोदींना दिले. ते म्हणाले- हरियाणात भाजपचे सरकार आले, जम्मू-काश्मीरमध्ये पक्षाचा मतदानाचा टक्का वाढला, हे मोदींच्या सेवा कार्याचे फळ आहे.

# मास्टर बेंचप्रेस चॅम्पियनशिप मध्ये सुप्रिया सुपेकरला रौप्यपदक




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

दक्षिण आफ्रिकेत झालेल्या कॉमन वेल्थ क्लासिक ज्युनिअर , ज्युनिअर पावर लिफ्टींग अँड क्लासिक सब ज्युनिअर अँड मास्टर बेंचप्रेस चॅम्पियनशिप स्पर्धेत शेतकरी कुटुंबातील सुप्रिया पांडुरंग सुपेकर हीने रौप्यपदक पटकावले. ५२ किलो गटामध्ये झालेल्या स्पर्धेत इंग्लंड व पाकिस्तानातील प्रतीस्पर्ध्यांसोबत खेळत रौप्यपदक मिळविले.यापूर्वीही सुप्रिया सुपेकर हीने २०२३ मध्ये हाँगकाँग येथे झालेल्या एशियन पॅसीफिक स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून यश मिळवले होते. सुपेकर हिच्या यशात वडील पांडुरंग सुपेकर , आई कांचन सुपेकरयांचे मोलाचे योगदान आहे.तसेच तिचे प्रशिक्षक डॉ.शर्वरी इनामदार यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले.यावेळी बोलताना सुप्रिया सुपेकर म्हणाली , पॉवर लिफ्टिंग ची मला लहानपणापासूनची आवड होती.माझ्या यशामागे आई वडिलांनी दिलेला पाठिंबा आणि दर्शविलेल्या विश्वासामुळे मी यश मिळवू शकले. येणाऱ्या काळात ही पॉवर लिफ्टींगच्या माध्यमातून देशाची सेवा करण्यास कटिबद्ध राहणार आहे.


# पुनर्वसित गावठाण नागरी सुविधेसाठी २५ कोटींचा निधी-आमदार राहुल कुल

## आमदार राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**





दौंड तालुक्यातील पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधांसाठी सुमारे २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि,दौंड तालुक्यात १९७६ पूर्वीच्या वीर बाजी पासलकर,पानशेत धरण प्रकल्पाचे पुनर्वसन झालेल्या गावांची संख्या सुमारे ४० असून त्या गावातील नागरिकांना नागरी सुविधा मिळाव्यात यासाठी आमदार राहुल कुल यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मदत व पुनवर्सन मंत्री अनिल पाटील यांचेकडे निवेदनाद्वारे विनंती केली होती.त्यानुसार तालुक्यातील गावांसाठी सुमारे २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आला आहे.

यामुळे या गावामध्ये अंतर्गत रस्ते,बंदिस्त गटर, स्मशानभूमी सुधारणा,समाजमंदिर,पाण्याची टाकी आदी कामे केली जाणार आहेत. गावनुसार मिळालेला निधी पुढील प्रमाणे - पाटस - ३ कोटी ७० लाख,नानविज - २ कोटी ४६ लाख, गार - २ कोटी १५ लाख,पारगाव - १ कोटी ७० लाख,कानगाव - १ कोटी ५६ लाख,गिरिम - १ कोटी ५५ लाख,राजेगाव १ कोटी ५२ लाख,सोनवडी - १ कोटी ४० लाख,पिंपळगाव - १ कोटी १४ लाख, मलठण - ९७ लाख,राजेगाव - ८३ लाख, दौंड - ७७ लाख, पेडगाव - ७६ लाख, वरवंड - ६९ लाख, केडगाव - ६३ लाख,हिंगणीबेर्डी - ५३ लाख, लिंगाळी - ५२ लाख, उंडवडी - ५२ लाख,राजेगाव - ४५ लाख, वाटलुज - ३६ लाख,कासुर्डी - २७ लाख, खामगाव - २६ लाख,दापोडी - २२ लाख, देऊळगावराजे - १३ लाख अशा प्रकारे निधी मंजूर झाला आहे. मंजूर करण्यात आलेली हि सर्व कामे लवकरच सुरु होतील व नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होतील असे आमदार राहुल कुल यांनी सांगितले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904